कोकण, प. महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ येथून एकाचवेळी प्रकाशित होणारे वृत्तपत्र

26/06/2025, मुंबई , महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि सरपंच https://gramwarta.in

# आत्मा अकोट अंतर्गत अंबोडा येथे केळी पिकाची शेती शाळा संपन्न



दिलीप कराळे, संपादक-विदर्भ विभाग, संपर्क-९०११९८१२९९

अकोट (अकोला) : कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अकोट व कृषी विज्ञान केंद्र अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 23/06/2025 रोजी अंबोडा येथे सरपंच प्रशांतभाऊ ताडे यांच्या प्रमुख उपस्थितीत केळी पीक व्यवस्थापन या विषयावर शेतीशाळा वर्ग राबविण्यात आला. अकोट तालुक्यामध्ये प्रकल्प संचालक (आत्मा) अकोला डॉ. मुरली इंगळे व तालुका कृषी अधिकारी अकोट अश्विनी बिराजदार यांच्या मार्गदर्शनात केळी पीक व्यवस्थापन या विषयावर शेतीशाळा राबविण्यात येत आहे.

ग्राम अंबोडा येथील शेतीशाळा वर्गामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून गजानन तुपकर विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) कृषी विज्ञान केंद्र अकोला हे होते. दुष्यंत देशमुख कार्यक्रम सहाय्यक माती परीक्षण कृषी विज्ञान केंद्र अकोला हे होते. शेतीशाळा वर्गाच्या प्रास्ताविकामध्ये राहुल अडाणी, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) यांनी अंबोडा गावामध्ये केळी पीक व्यवस्थापन शेतीशाळा आयोजनाबाबत उद्दिष्ट स्पष्ट करून ही शेतीशाळा कशा पद्धतीने राबविण्यात येणार आहे याविषयी सविस्तर माहिती शेतकऱ्यांना करून दिली. शेतीशाळा वर्गामध्ये शास्त्रज्ञ यांच्याकडून केळी पिकाबद्दल मिळालेल्या माहितीचा आपल्या शेतीमध्ये वापर करावा व प्राप्त माहिती इतर शेतकरी बांधवांपर्यंत देखिल पोहोचवावी असे आवाहन केले.

शेतीशाळेच्या पहिल्या वर्गामध्ये मार्गदर्शन करताना गजानन तुपकर विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) यांनी केळी पिकांमधील संवेदनशील अवस्था याविषयी माहिती देऊन सदर शेती शाळा ही केळीच्या चार प्रमुख संवेदनशील अवस्थेमध्ये घेण्यात येईल याविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली. तांत्रिक मार्गदर्शन करत असताना त्यांनी केळी पिकाचे प्रमुख वान तसेच केळी पिकासाठी लागणारे हवामान, उत्कृष्ट आणि दर्जेदार केळीची रोपे कशा पद्धतीने निवड करावी, रोपे आणल्यानंतर त्याला हार्डनिंग करण्याची पद्धत आणि बुरशीनाशकाची आळवणी करण्याची पद्धत याविषयी माहिती दिली. सदर शेतीशाळा दरम्यान गावातील प्रगतिशील शेतकरी यांचे शेतीवर प्रात्यक्षिक करण्याचे सर्वांमध्ये ठरविण्यात आले. प्रात्यक्षिकादरम्यान गजानन तुपकर यांनी केळी पीक लागवड करत असताना कशा पद्धतीने लागवड करावी, लागवडीचे अंतर किती ठरवावे, लागवड पश्चात त्याला आळवणी कशा पद्धतीने करावी याविषयी सविस्तर माहिती दिली. दुष्यंत देशमुख यांनी केळी पिकामध्ये मुख्य अन्नद्रव्ये तसेच सूक्ष्म अन्नद्रव्य आणि केळी पिकाला लागणारे वर्षभराची गरज याविषयी माहिती देऊन केळी पिकाला माती परीक्षण आणि पाणी परीक्षण कसे आवश्यक आहे याविषयी प्रात्यक्षिकाच्या स्वरूपातून त्यांनी नमुना कसा काढावा याविषयी माहिती दिली. प्रात्यक्षिक सत्राच्या दरम्यान शेतकरी बांधवांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांविषयी तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. सहाय्यक कृषी अधिकारी करणसिंह आसोले यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांबाबत व तसेच ॲग्रीस्टॅक नोंदणीबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली.

या शेतीशाळा वर्गामध्ये सहाय्यक कृषी अधिकारी ईश्वर बैरागी व केळी पिक उत्पादक शेतकरी बांधव उपस्थित होते.